बीड । गुरुवार

१२.०६.२०२५

वर्षे : ५ अंक : ७२

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१








# वैज्ञानिक काकासाहेब लोणकर यांचे अकाली निधन






## पंधरा दिवसांपूर्वीच त्यांचे वडील भाऊसाहेब लोणकर यांचे झाले होते निधन

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील निपाणी जवळका येथील कल्याण ठाणे येथे रहिवाशी असलेले प्रसिद्ध वैज्ञानिक काकासाहेब लोणकर यांचे सोमवार दिनांक ९ जून रोजी सकाळी ६:०० वा वयाच्या ४१ व्या वर्षी कराड येथे त्यांची कंपनी आलेल्या ठिकाणी दुःखद निधन झाले. त्यांच्या या अकाली निधनामुळे बीड जिल्ह्यासह गेवराई तालुक्यात कल्याण मध्ये नातेवाईक मित्र परिवारामध्ये शोकोकळा पसरली आहे.

काकासाहेब लोणकर यांनी अत्यंत नाजूक परिस्थितीमध्ये आपले शिक्षण पूर्ण करत विज्ञान क्षेत्रात नाव कमवले होते. कोरोना काळात हजारो लोकांचे प्राण वाचवण्यासाठी काकासाहेब लोणकर यांची धडपड सुरू होती. विशेष म्हणजे ग्रामीण भागात शेतात काम करत असताना अनेक शेतकऱ्यांना सर्पदंश होऊन मृत्यूला सामोरे जावे लागते या साठी काकासाहेब लोणकर यांनी कराड येथे १५ एकर जागेत सर्पदंश रोगावर औषधी निर्माण करण्याचे स्वप्न पाहिले होते व राज्यातील संपूर्ण जिल्हा रुग्णालयात मोफत या औषधीचे वाटप करण्याचे ध्येय काकासाहेब लोणकर यांनी समोर ठेवले होते. त्यांच्या पश्चात आई जनाबाई लोणकर, पत्नी अर्चना लोणकर,दोन मुले व बहीण उर्मिला लोणकर ींहरींी त्यांच्या या अकाली निधनाने एकीकडे वैज्ञानिक क्षेत्रात मोठी हानी पोहोचली असून बीड जिल्ह्याचा सुपुत्र हरवल्याने गेवराईसह निपाणी जवळका कल्याण या ठिकाणी शोककळा पसरली आहे. दैनिक मराठवाडा पत्र परिवार त्यांच्या दुःखात सहभागी आहे.



# छत्रपती संभाजीनगर; सिद्धार्थ उद्यानातील प्रवेशद्वारावर असलेला डोम कोसळून दोन महिलांचा जागीच मृत्यू

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगरमध्ये वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे सिद्धार्थ उद्यानातील प्रवेशद्वारावर असलेला डोम अचानक कोसळला. यामध्ये २ पर्यटकांचा मृत्यू झाला तर ५ जण जखमी आहे. जखमी आणि मृतांना घाटी रुग्णालयात दाखल केले आहे.सायंकाळी साडे सहाच्या दरम्यान छत्रपती








संभाजीनगर शहरात जोरदार वादळ आलं, पावसाच्या सरी कोसळल्या. सिद्धार्थ उद्यानाच्या प्रवेशद्वाराचा वरचा काही भाग निखळला नागरिकांच्या अंगावर पडला. प्राथमिक माहितीनुसार ५ जण जखमी झाले आहेत. तर, एक जण गंभीर जखमी झाले आहेत. या प्रवेशद्वाराचं काही वर्षांपूर्वी नुतनीकरण झालं होतं, तो भाग कसा काय कोसळला असा प्रश्न निर्माण ▶▶ उर्वरित पान २ वर

# महायुती सरकारच्या फसव्या घोषणे विरोधात शिवसेनेचा आज भव्य रस्ता रोको

## शेतकरी व लाडक्या बहिणींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे : जिल्हाप्रमुख उल्हास गिराम

**बीड । प्रतिनिधी**

महायुती सरकार कडून सत्तेत येण्यापूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी सह अनेक प्रलोभने दाखवली तसेच लाडक्या बहिणींना पण १५०० रुपया वरून २१०० रुपये महिना करू असे आश्वासन दिलेले होते, मात्र सत्तेत आल्यानंतर या



आश्वासनाचा महायुती सरकारला विसर पडला सत्तेत आल्या पासून महायुती सरकार सातत्याने शेतकऱ्यावर अन्याय करत असून जुलमी धोरणे राबवून देशोधडीला लावण्याचे काम करत आहे.

अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अद्याप पर्यंत नुकसान भरपाई मिळाली नाही, मोफत वीज, पाणंद रस्ते, हर घर जल, हर घर छत या आश्वासनाकडे ही महायुती सरकारने कानाडोळा करीत दुर्लक्ष केले आहे, म्हणून या विसर भोळ्या सरकारला झोपेतून जागे करण्यासाठी शिवसेना

▶▶ उर्वरित पान २ वर

# मुले आई-वडिलांची नक्कल करतात म्हणून माऊली दादा सारखे संस्कार करा: प्रदीप मिश्राजी

## माऊली दादासारखे संत कलियुगात पुन्हा होणे नाही : ह. भ. प. रामराव ढोक महाराज

**चाकरवाडी । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पंचेविसाव्या पुण्यस्मरणार्थ आज ह.भ.प. रामराव ढोक महाराज यांचे गुलालाचे कीर्तन झाले राम राव महाराज ढोक यांनी माऊली दादाच्या आठवणींना उजळा देत माऊली दादाची कीर्ती चंद्र सूर्य असे पर्यंत अजरामर झाली आहे माऊली दादाचा वारसा तपोनिधी



शांतीब्रह गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर हे अतिशय समर्पक भावनेतून पुढे नेत आहेत. माऊली दादा सारखे संत या घोर कलियुगात पुन्हा होणे नाही असे ह.भ.प. रामराव ढोक महाराज यांनी कीर्तनात प्रतिपादन केले. शिवमहापुराण कथेत प.पूज्य. प्रदीप मिश्राजी यांनी शिवमहापुराण कथेत सांगितले की घरातील ▶▶ उर्वरित पान २ वर

### पावसाची हजेरी

**चाकरवाडी येथे सुरू असलेल्या शिवपुराणकथेस आज भाविकांनी गर्दीचा उच्चांक निर्माण केला. अशा परिस्थितीत पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे भाविकांनी भर पावसात छत्री आणि गोपाटचा आधार घेत शिवपुराण कथा ऐकण्याचे पुण्य पदरात पाडून घेतले.**

### मान्यरांची भेट

**संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या आशीर्वादाने सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाला भाविकांची प्रचंड गर्दी होत असून मान्यवर लोकही भेटी देत आहेत. बुधवारी गोरख बाबा, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, माजी मंत्री बदामराव पंडित, नंदकिशोर मुडदा सह आदींनी भेटी देऊन शिवपुराण कथेचा लाभ घेतला.**

# माजी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.कमलाकर आंधळे यांचे निधन

**बीड । प्रतिनिधी**

बीडचे तात्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.कमलाकर साहेबराव आंधळे यांचे बुधवार दि.११ जून २०२५ रोजी संध्याकाळी ८ वाजता पुणे येथील हॉस्पिटलमध्ये अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी ते ६५ वर्षाचे होते. त्यांच्या पार्थिवावर आज दि.१२ जून रोजी बीड



शहरातील अंकुशनगर येथील

▶▶ उर्वरित पान २ वर








# आष्टी सह परिसरात वादळवाऱ्यासह पावसाचा कहर

## चक्रीवादळ पावसाळामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचे तात्काळ पंचनामे करा : तहसीलदार वैशाली पाटील









**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यासह परिसरात वादळी चक्रीवादळाचे नुकसान या परिसरात झाले असून या परिसरात जोरदार पावसाने हजेरी लावत वादळ वाऱ्यासह कहर केला आहे.तात्काळ नुकसानीमुळे उदभवलेल्या परिस्थितीचे पंचनामे करावेत असे आदेश तहसीलदार वैशाली पाटील यांनी दिले आहेत. आष्टी शहर व परिसरात अचानक उद्भवलेल्या चक्रीवादळामुळे अनेक भागात अतोनात नुकसान शेतकरी व आष्टी शहर नागरिकांचे झाले असून यामध्ये अनेक ठिकाणी राज्य महामार्ग व राष्ट्रीयमहामार्गावरील मोठं मोठे झाडे मुळा सकट उन्मळून पडलेले असून महावितरण च्या तारासह पोल खाली पडले असून या पडलेल्या पोल व झाडामुळे महामार्गावरील रस्ते बंद पडले होते तर शेतातील शेतीमालाचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.या नुकसानग्रस्त भागाची पाहणी करत तहसीलदार वैशाली पाटील यांनी करत या नुकसानग्रस्त भागाची तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांनी तात्काळ पंचनामे करावेत असे आवाहन आष्टीचे तहसीलदार वैशाली पाटील यांनी केले आहे.

# सण-उत्सवांत शास्त्रविसंगत प्रयोग नको !

शिस्त आणि नियम जसे वैयक्तिक जीवनात असतात तसे ते सामाजिक आणि व्यावहारिक जीवनातही असतात. त्यांचेही पालन आपण करत असतो. जशी वाहने नेहमी डाव्या बाजूने चालवावीत, सिग्नल लागल्यावर वाहन थांबवावे, तिकीट काढताना, बँकेत पैसे भरताना आणि काढताना ज्या ज्या ठिकाणी रांग लावण्याचा नियम आहे त्या ठिकाणी आपण ती शिस्त आणि नियम पाळतो. प्रवास करताना आपण स्वतःहून तिकीट काढतो. पास, पीयूसी, इन्शुरन्स, परवाने यांची मुदत संपली असेल तर ते स्वतःहून रिन्यू करून घेतो. अर्थात हे सर्व नियम नाही पाळले तर काही ठिकाणी दंडाची व्यवस्था करण्यात आलेली असते. याशिवाय इतरांची बोलणी खावी लागतात ती वेगळी. व्यवहारिक जीवनात वावरताना आपण प्रत्येक नियम आणि त्यामागील शिस्त यांचे तंतोतंत पालन करत असतो. घरचा टीव्ही बिघडला कि टीव्ही दुरुस्त करणाऱ्याकडे जातो, आजारी पडल्यावर डॉक्टरकडे जातो, कोणाविरुद्ध तक्रार दाखल करायची असल्यास पोलिसांकडे जातो, न्याय मागण्यासाठी वकिलांची मदत घेतो, मुलांना शिकण्यासाठी शाळेत घालतो. घर बांधण्यासाठी गवंड्याला बोलावतो, फर्निचरचे काम असेल तर सुताराला बोलावतो, साधी चप्पल फाटली असेल तरी आपण ती स्वतः शिवत नाही. थोडक्यात व्यावहारिक जीवनात ज्या ज्या ठिकाणी आपल्याला अडचण किंवा समस्या उद्भवते त्या त्या वेळी आपण त्या क्षेत्रातील तज्ज्ञाकडे जातो आणि ती समस्या सोडवतो. मी कायद्यांचा अभ्यास केला आहे म्हणून माझी केस मी लढू शकत नाही, शस्त्रक्रियेवरील पुस्तके वाचली म्हणून मी कोणाची शस्त्रक्रिया करू शकत नाही या गोष्टी कोणाला सांगाव्या लागत नाहीत कारण



त्या प्रत्येकालाच कळतात. ज्या ठिकाणी अध्यात्म अथवा धर्मशास्त्र येते त्या ठिकाणी मात्र आम्ही हिंदू मंडळी मलाच जास्त कळते, मी म्हणेल तेच खरे म्हणू लागतो. हल्लीच वटपौर्णिमा सण सर्वत्र उत्साहात साजरा झाला. सौभाग्याच्या रक्षणासाठी आणि दीर्घायुष्यासाठी स्त्रिया व्रतस्थ राहून हा सण साजरा करतात. वडाचे पूजन करून पतीच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करतात. या व्रतामागिल सत्यवान सावित्रीची कथा सर्वांनाच ठाऊक आहे. मात्र इथेही हिंदूनी आपली बुद्धी चालवलीच. कुडाळमध्ये पत्नीच्या दीर्घायुष्यासाठी पुरुषांनी उपवास करून वटवृक्षाला फेऱ्या मारल्या. मागील १६ वर्षांपासून ही प्रथा याठिकाणी सुरु आहे. झी मराठी वाहिनीवर सुरु असलेल्या शिवा या मालिकेतील शिवा ही भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्रीच्या पायाला दुखापत झाल्याने मालिकेत आशुचे पात्र साकारणारा अभिनेता तिला बाईकवर घेऊन येतो आणि शिवा ही बाईकवर बसून वटवृक्षाला फेऱ्या मारताना दाखवण्यात आले. यंदा विवाह झालेली अभिनेत्री रेश्मा शिंदे यंदा हिने आपली पहिली वटपौर्णिमा घरीच साजरी केली. तिच्यासोबत तिचा नवरा पवन यानेही वडाच्या फांदीला फेऱ्या मारल्या. धुळ्यातील मालेगाव रोड परिसरात तृतीय पंथीयांनी वडाची पूजा करून त्याभोवती फेऱ्या मारल्या. गतवर्षी बुलढाण्यातील दत्तपूर गावात या दिवशी सुवासिनींनी अन्य सुवासिनींसोबत तेथील विधवा महिलांनाही कुंकू लावले. विधवा महिलांनीही यावेळी वडपूजन करून वडाला प्रदक्षिणा घातल्या. वटपौर्णिमेचे व्रत हे पतीच्या दीर्घायुष्यासाठी आहे हे या महिलांना ठाऊक नाही का ? काहीतरी वेगळे करायचे आणि प्रसिद्धी मिळवायची, मग त्यामध्ये धर्मशास्त्र पायदली तुडवले गेले तरी चालेल ही हिंदूंची वृत्ती इथेही दिसून आली. पतीच्या दीर्घायुष्यासाठी आणि चांगल्या आरोग्यासाठी महाराष्ट्रात ज्याप्रमाणे वटपौर्णिमा साजरी केली जाते त्याप्रमाणे उत्तर भारतात करवा चौथ साजरा केला जातो. गेल्याच वर्षी करवा चौथच्या दिवशी एका कुमारिकेने आपल्या प्रियकरासाठी व्रत केले आणि त्याला व्हिडीओ कॉल करून त्याचे पूजन केले. धर्मशास्त्र विसंगत असे काही विचित्र प्रयग केले तर लगेचच प्रसिद्धी मिळते, यांचे व्हिडीओज सोशल मीडियावर व्हायरल होतात, लोकांकडून ते फॉरवर्ड केले जातात. नास्तिक आणि पुरोगामी मंडळी यांचे कौतुक करते, यांना क्रांतिकारकांची उपमा देते. मात्र असले प्रयोग करून कोणताही अध्यात्मिक लाभ न होता हानी मात्र होते हे या महाभागांना कोण समजावणार ? होळीच्या दिवशी कचऱ्याची होळी करणे, टाकाऊ पदार्थापासून गुढी तयार करून उभारणे, महाशिवरात्रीला शिवपिंडीवर दूध न चढवता ते लोकांना वाटणे, टाकाऊ पदार्थांपासून गणेशमूर्ती साकारून तिचे पूजन करणे यासारखे प्रयोग केवळ हिंदूंच्या सणांमध्ये हिंदूंच करत असतात. मुस्लिमांनी बकरी ईदच्या दिवशी मातीची प्रतीकात्मक बकरी करून तिची कुर्बानी दिल्याचे कधी ऐकले आहे का ? ख्रिसमस ट्रीमुळे प्रदूषण होते हे ज्ञात असूनही कोण्या ख्रिस्ती व्यक्तीने ख्रिसमसला ख्रिसमस ट्री आणू नका असे आवाहन केले आहे का ? मग हिंदूच आपली बुद्धी का चालवतात ? प्रत्येक सणामागील शास्त्र काय आहे आणि तो कसा साजरा करावा याबाबतचा सखोल अभ्यास आणि लेखन अध्यात्मातील अधिकारी वर्गाने म्हणजेच आपल्या ऋषी मुनींनी हजारो वर्षांपूर्वी केले आहे. त्यामुळे ते तसे साजरे केल्यानेच आपणाला लाभ होणार आहे. आरंभी उल्लेख केल्याप्रमाणे व्यवहारिक जीवनात आपण त्या त्या क्षेत्रातील अधिकारी व्यक्तींचा सल्ला घेतो मग धार्मिक बाबतीत बुद्धीचा वापर का करतो ? आपल्या अशा प्रयोगाने येणाऱ्या पिढीमध्ये संभ्रम निर्माण होऊन अध्यात्माविषयी आणि आपल्या धर्मशास्त्राविषयी त्यांचा विश्वास डळमळीत होणार नाही का ? पाश्च्यात्य देशांमध्ये विज्ञानाने दिलेली सुखाची साधने मुबलक प्रमाणात असली तरी सर्वत्र अनैतिकता बोकाळली आहे, कुटुंबव्यवस्था नष्ट होऊ लागली आहे, मानव निराशेत आणि ताणामध्ये जगत आहे. अशा परिस्थितीत स्वतःचा आणि समाजाचा उद्धार करण्यास शिकवणारी प्राचीन भारतीय संस्कृती, ग्रंथसंपदा आपल्याला आपल्या पुण्याईने लाभली आहे, तिचा लाभ घेऊया. नको तिथे बुद्धीचा वापर करणे टाळूया !

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई

पान १ वरून पुढे...

### छत्रपती संभाजीनगर...

झाला आहे. शहरात एक झाड कोसळलं असून एक महिला जखमी झाल्याची माहिती आहे. मृतकांच्या नातेवाईकांचा रुग्णालयात आक्रोश– घटनेची माहिती मिळताच पोलीस देखील घटनास्थळी दाखल झाले. ही घटना मंगळवारी ११ जूनला सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास घडली. मृतकांच्या नातेवाईकांनी घाटी रुग्णालयात प्रचंड आक्रोश केला. घटनेत २ महिलांचा मृत्यू– या दुर्घटनेत ३७ वर्षीय महिला स्वाती अमोल खैरनार यांचा मृत्यू झाला. त्या चाळीसगावच्या धामणगाव येथील रहिवासी होत्या. सध्या त्या रांजणगाव शेणपुंजी येथे वास्तव्यास होत्या. तर ६५ वर्षीय रेखा हरिभाऊ गायकवाड यांचादेखील या घटनेत मृत्यू झाला. त्या गजानन नगर परिसरात वास्तव्यास होत्या. ४ लहान मुलं किरकोळ जखमी– या घटनेत अखिल शेख यांच्यासह आणखी एक जखमी आहे. यासोबत चार लहान मुलं यामध्ये किरकोळ जखमी झाले आहेत. घटना नेमकी कशी घडली? याप्रकरणी स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजी नगर शहरामध्ये पाच वाजेच्या सुमारास वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. वाऱ्याचा वेग अधिक असल्याने अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली तर पत्रे उडून गेली. दरम्यान सिद्धार्थ उद्यानामध्ये

पान १ वरून पुढे...

पर्यटनासाठी आलेले पर्यटक प्रवेशद्वाराच्या डोम खाली उभे होते. हवेच्या आणि पावसाच्या वेगाने उद्यानाचा डॉमवरचा काही भाग खाली कोसळला. मलब्याखाली तीन जण अडकली– यावेळी प्रवेशद्वाराजवळ उभी असलेले तीन जण मलब्याखाली दबून गंभीर झाले. यासह पाच मुलं देखील किरकोळ जखम झाली. जखमींवर उपचार सुरु– दरम्यान नागरिकांनी कर्मचाऱ्यांनी तात्काळ जखमींना घाटी रुग्णाला दाखल केले. यावेळी डॉक्टरांनी दोन महिलांना तपासून मृत घोषित केले. तर दोन जखमींवर उपचार सुरू असून चार मुलांना किरकोळ मार लागला आहे. त्यांच्यावर देखील उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक अविनाश आघाव, मंगेश जगताप यांच्यासह अधिकारी कर्मचारी घाटी रुग्णालयात दाखल झाले.

### महायुती सरकारच्या...

पक्षाकडून क्या हुआ तेरा वादा असा जाब विचारून आंदोलन करण्यात येत आहे त्याचाच एक भाग शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने दिनांक १२/०६/२०२५ रोजी, सकाळी ११ वाजता भव्य रस्ता रोको करण्यात येणार आहे या रस्ता रोको आंदोलनास मोठया संख्येने शेतकरी, लाडक्या बहिणींनी उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख

पान १ वरून पुढे...

उल्हास गिराम यांनी केले आहे सदरील पत्रकावर जिल्हा समन्वयक भाई संजय महाद्वार, जिल्हा संघटक नितीन धांडे, उपजिल्हाप्रमुख राजू महूवाले, हनुमान जगताप आशिष मस्के, सहसंघटक रतन गुजर, युवा सेना जिल्हा संघटक अभिषेक दिवे, महिला आघाडी जिल्हा संघटक मीरा ताई नवले विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, कामगार आघाडीचे जिल्हा संघटक रवी वाघमारे, अल्पसंख्यांक आघाडीचे संघटक सय्यद नय्युम, शिव वाहतूक सेनेचे मशरू पठाण, सतीश परदेशी, दिलीप पवार, गणेश लोणकर, नवनाथ प्रभाळे, प्रदीप कोटुळे यांच्या सह्या आहेत

### मुले आई-वडिलांची...

वातावरण अध्यात्मिक आणि सुसंस्कृत असले पाहिजे टीव्ही मोबाईल पाहण्यापेक्षा आध्यात्मिक व संस्कार निर्माण करणारी पुस्तके आई वडिलांनी वाचावीत, यामुळे मुलांवर चांगले संस्कार होतील. मुले आई–वडिलांचे नक्कल करत असतात असे मार्गदर्शन प्रदीप जी मिश्रा यांनी केले. श्री क्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या कृपाशीर्वादाने व तपो निधी शांती ब्रह्मा गुरुवर्य महादेव महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथेत परमपूज्य प्रदीप जी मिश्रा बोलत होते. यावेळी पुढे बोलताना प्रदीप जी मिश्रा यांनी मोलाचे मार्गदर्शन केले शिवपुराण कथेचे महत्व विशद करत असतानाच सध्याच्या परिस्थितीवर ही त्यांनी भाष्य केले शरीर व मनाची भूक भागवण्यासाठी अध्यात्माची अत्यंत गरज आहे. शरीर

पान १ वरून पुढे...

हे कष्टरहीत असावे तर मनाची भूक भागविण्यासाठी अध्यात्माची गरज आहे मन हे भक्तीत आणि शरीर हे कष्टात समाविष्ट करणे गरजेचे आहे. संत ज्ञानेश्वर माऊली दादा हे आध्यात्मिक होते शिवशंकरावर त्यांचे अपार श्रद्धा होती मोठी भक्ती होती श्रद्धा होती त्यांच्या आचरणाचे सर्व संस्कार महादेव महाराज या मुलांमध्ये उतरले मुले ही आई–वडिलांचे नक्कल करत असतात त्यामुळे आई–वडिलांचे वर्तन हे सुसंस्कृत व अध्यात्मिक असायला हवे. पुढे मुले ही याच वृत्तीचे अनुकरण करत असतात.आई वडीलांनी घरात टीव्ही मोबाईल पहात बसण्यापेक्षा आध्यात्मिक व सुसंस्कृत पुस्तके वाचवित. याचा परिणाम मुलांवर होत असून मुलेही चांगल्या विचारांची निर्माण होतील. पत्नी, मुले यांना वेळ द्या, परिवारासाठी परिवारासाठी वेळ देण्याची तयारी ठेवा पती–पत्नीने त्यागी वृत्ती अंगीकारली तर कुटुंबात कलह निर्माण होऊ शकत नाही. भोलेनाथ भक्ती केल्यानंतर कोणालाही नाराज करत नाहीत त्यामुळे शिवशंकरावर श्रद्धा ठेवून ती करा जीवनात नक्कीच दुःख संपवून आनंद निर्माण होईल असे मुलाचे विचार याप्रसंगी प्रदीप जी मिश्रा.

### माजी जिल्हा...

अमरधाम स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. दरम्यान, त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा कपिल कमलाकर आंधळे, मुलगी कल्याणी अरविंद घुगे, जावई आयआरएस अरविंद घुगे बंधू, डॉ.सुधाकर साहेबराव आंधळे, मेहुणे प्रवीण रावसाहेब मिसाळ यांच्यासह सुन, नातवंडे असा मोठा परिवार आहे. दरम्यान, त्यांच्या दुःखात दैनिक मराठवाडा पत्र परिवार सहभागी आहे.

पान ४ वरून पुढे...

### मोमीन रेहान...

याचा दुर्देवी मृत्यू झाला. रेहान मोमीन याच्या अकाली निधनाने परिसरात हळूहळू व्यक्त करण्यात येत होती. रेहान मोमीन याचा दफनविधी केसापुरी कॅम्प येथील कब्रस्तान मध्ये करण्यात आला. रेहान मोमीन याच्या पश्चात आई–वडील व दोन बहिणी असा परिवार असून मोमीन कुटुंबीयांच्या दुःखात दैनिक मराठवाडा पत्र सहभागी आहे.

### जि.प. शाळा...

आदी ग्रामपंचायतने करमाफी देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. तसेच शाळेत सीसीटीव्ही, शैक्षणिक साहित्य आणि पटसंख्या भरपूर असुन विद्यार्थ्यांना उत्तेजन देणारे उपक्रम राबविण्यात येत असुन गुणवत्तापूर्ण विद्यार्थी आहेत. शाळेमध्ये सर्वांगीण विकासासाठी नांदुरघाट ग्रामसथ मोलाचे योगदान देत आहेत.जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांनी जनजागृती करावी,पालकांशी संपर्क करावा, सर्वेक्षण, अंगणवाडी,गृहभेटीतुन जनजागृतीचे उपक्रम राबवुन पटसंख्या किमान १५ ते २५ टक्के जास्त वाढविण्याचे निर्देश शिक्षण आयुक्तांनी दिले आहेत.सर्वात जास्त पटनोंदणी केलेल्या शाळांचा गौरव करण्यात येणार आहे आणि दुसरीकडे नांदुरघाट येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत पटसंख्या वाढविण्यासाठी प्रयत्नशील ग्रामस्थांची अडवणूक केली जात असुन असा दुजाभाव का?? त्यासाठी अमोल जाधव अध्यक्ष शालेय शिक्षण समिती यांच्यावर आत्मदहनाची वेळ यावी हा ढोंगीपणा नाही का?? असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

### तेलगाव येथील...

महामार्ग मोकळा करुन देण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. लवकरात लवकर हा प्रश्न सोडवला तर ठीक नाहीतर रस्त्यावर उतरण्याचा इशारा यावेळी नागरिकांनी दिला. धारूर तालुक्यातील मौजे तेलगाव येथून खामगाव सोलापूर हा महामार्ग जातो. या महामार्गाचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले असून जागोजागी भेगा पडल्यामुळे अनेक अपघात होऊन अनेक लोकांचा बळी गेलेला आहे. तेलगाव येथे या महामार्गावर पावसाने पाण्याचे तळे साचले आहे. या पाण्यात घसरून अपघाताचे प्रमाण वाढले आहे. हा प्रश्न गंभीर बनला आहे याबाबत तेलगाव येथील नागरिकांनी खा. बजरंग सोनवणे, माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांची भेट घेऊन निवेदन दिले. आ. सोळुंके यांनी या प्रकरणाची दखल घेत एम.आर.डी. सी. कंपनीच्या अभियंत्याला चांगले सुनावले. महामार्गावर साठलेल्या पाण्यामुळे अपघाताला आमंत्रण मिळते आहे. तुम्हाला दुरुस्तीचे काम करायचे नसेल तर मानसं मरू द्यायचे का असा संतप्त सवाल आमदार सोळुंके यांनी सदर कंपनीच्या अभियंताला विचारला. लवकरात लवकर या पाण्याचा निचरा करून नागरिकांचा प्रश्न सोडवावा असा आदेश आमदार प्रकाश सोळंके यांनी अभियंताला दिला. आ. सोळंके यांनी दखल घेऊन देखील एम.आर. डी. सी. कंपनीचे अधिकारी तेलगाव येथे फिरकले नाहीत. ग्रामस्थांनी उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री अजित पवार यांना फोन करून माहिती दिली. अजितदादांनी यांची दखल घेऊन प्रश्न मार्गी लावण्याचे आदेश दिल्यानंतर एम. आर.डी. सी.चे अधिकारी श्रीमती सुनिता वनवे, अतुल कोट्याचा यांनी बुधवार दिनांक ११ जुलै रोजी तेलगाव येथे येऊन महामार्गाची पाहणी केली. पाण्याचा निचरा करण्यासाठी उपाययोजना करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. यावेळी तेलगाव येथील जेष्ठ नागरिक तथा माजी शिक्षणाधिकारी आर. बी. लगड, सरपंच बाबुराव धुमाळ, महेश लगड, विकास लगड, नामदेव सावंत, पवन गायकवाड अमर लगड, राहुल गायकवाड, किशोर गायकवाड, अतुल लगड, जाधव अक्षय लगड विष्णू, गिरीराज फरतडे, विष्णू मोरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कृत्रिम वाळू...

बांधकामांमध्ये कंत्राटदाराने २० टक्के कृत्रिम वाळूचा वापर करणे बंधनकारक

पान ४ वरून पुढे...

करण्यात आलेले आहे . कृत्रिम वाळू कशी बनते : सध्या वापरात असलेली प्रचलित वाळू ही नदीमध्ये जमा झालेली असते . नदीमध्ये उत्खनन करून वाळू काढली जाते. याबाबत अनेक धोरणे बदलली. पूर्वी एखादा वाळूघाट निश्चित करून विशिष्ट कालावधीसाठी ठेकेदारांना विशिष्ट ब्रास वाळू काढण्याची मुभा दिली जात होती . तथापि यामुळे ठेकेदार , गावकरी, रस्तेवाले यांच्यात वाद निर्माण होत होते . अनेक बेकायदेशीर बाबींची सुरुवात झाली . गुन्हेगारी वाढली. वाळूचे विक्री दरही निश्चित नव्हते . त्यानंतर एक ते पाच वर्षासाठी वाळू घाट निश्चित करून एका डेपोपर्यंत वाळू आणून ठेवावी व तिथून पुढे लाभार्थ्यांपर्यंत पोहोच करावी अशी पॉलिसी ठरली . तथापि यातही अनेक त्रुटी होत्या. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी कळविल्यानुसार कृत्रिम वाळू ही दगडाचा चुरा करून तयार केली जाते . यामुळे कृत्रिम वाळूचा दर्जा नदीमध्ये उत्खनन करून काढलेल्या वाळू पेक्षा चांगला असतो. तसेच आकाराने छोटी किंवा मोठी अशा प्रकारामध्ये कृत्रिम वाळू तयार केली जाते. यामुळे बांधकामाचा दर्जा वाढतो. नदयांच्या पर्यावरणीय समतोलासाठी नदयांमधील नैसर्गीक वाळू सुरक्षित पध्दतीने वापरणे आवश्यक आहे. त्यामुळे नैसर्गिक वाळूला एम–सॅन्ड ( कृत्रिम वाळू ) पर्याय म्हणुन तयार करणे आवश्यक आहे . राज्यात वाळूची उपलब्धता कमी असल्याने सदर तुटवडा परराज्यातुन येणा–या वाळूमधुन भागवला जात आहे. तथापी भविष्यातील विकासकामांसाठी निश्चीत केलेली उद्दिष्टे पाहता राज्यातील वाळुची मागणी अनेक पटीने वाढण्याची शक्यता आहे . शासनाने व न्यायालयाने पर्यावरणपुरक मानके लागू केल्यामुळे नदीपात्रातील वाळूची उपलब्धता मर्यादित झाली आहे . त्यामुळे नदीपात्रातुन निघत असलेल्या वाळूची जागा घेऊ शकतील अशा दर्जेदार बांधकाम योग्य वाळूची गरज एम–सॅन्ड व्दारे पुर्ण केली जाऊ शकते . यासाठी शासनाने दिनांक २३ मे २०२५ च्या शासन निर्णयानुसार राज्यात विविध बांधकामासाठी कृत्रिम वाळूचा ( एम सॅन्ड ) वापर करण्याकरीता धोरण निश्चीत केलेले आहे .५० केंद्र :– बीड जिल्ह्यात ५० कृत्रिम वाळू निर्मिती केंद्र स्थापन करण्यास प्रशासनाकडून मान्यता देण्यात येणार आहे . यासाठी उद्योग सुरू करण्यास इच्छुक असणाऱ्यांची चाचपणी प्रशासनाकडून सुरू आहे . अशा उद्योगाना विविध सवलती देण्यात येणार आहेत . कृत्रिम वाळू धोरणाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत –१. नैसर्गिक वाळूचा वापर कमी करणे . २ . वाढती मागणी पुर्ण करण्यासाठी अतिरिक्त स्त्रोत विकसित करणे . ३. कृत्रीम वाळू विकासास प्रोत्साहन देणे. ४. एम सॅन्ड युनिटला उदयोग म्हणुन प्रोत्साहन देणे . ५. बी एस आय ने ठरवुन दिलेल्या मानकांनुसार दर्जेदार एम–सॅन्ड ला प्रोत्साहन देणे . ६. एम–सॅन्ड उत्पादन प्रक्रीयेचे मानकीकरण करणे . ७. शुन्य कचरा खाणकामाला प्रोत्साहन देणे . ८ . उदयोग म्हणुन एम–सॅन्ड युनिटची स्थापना करणे . निर्मिती प्रकल्प उभारण्याचे प्रयत्न :– बीड जिल्ह्यात कृत्रिम वाळू निर्मितीचे फारसे उद्योग उपलब्ध नाहीत . यामुळे जिल्ह्यात बांधकाम व्यावसायिक व शासकीय कंत्राटदारांना कृत्रिम वाळू उपलब्ध करून देण्यासाठी प्रकल्प उभारण्याची तयारी प्रशासनाकडून सुरू करण्यात आलेली आहे . एम सॅन्ड युनिटसाठी शासकीय प्रोत्साहन : – १. उदयोग म्हणुन एम–सॅन्ड युनिटची स्थिती कायम राहील . २ . एम–सॅन्ड युनिट स्थापन करण्यासाठी किमान निव्वळ उत्पन्न मर्यादा व आर्थीक उलाढालीची आवश्यकता नाही . ३. त्यानुसार प्रत्येक जिल्हयात प्रथम पुढाकार घेणा–या ५० इच्छुक / संस्था यांना एम–सॅन्ड युनिट स्थापन करण्यासाठी उदयोग विभागाच्या व महसुल विभागाच्या सवलती लागु राहतील . ४. शासकीय जमीनीवरील खाणपटट्यांसाठी लिलावामध्ये केवळ एम–सॅन्ड युनिट कार्यान्वीत करण्यासाठी भाग घेता येईल . ५ . शासकीय जमीनीवरील व खाजगी जमीनीवर एम–सॅन्ड युनिट करीता ५ एकरांपर्यंत खाणपट्टयासाठी जागा मंजुर करता येईल . शासनाची पुर्वमान्यता आवश्यक . ६ . अशा शासकीय व खाजगी जमीनीवर १ वर्षात एम–सॅन्ड युनिट सुरु करणे बंधनकारक आहे . ७. एम–सॅन्ड युनिट धारकांनी उत्खनन करतांना जलस्त्रोत तयार होण्यासाठी उत्खनन वर्तुळकार / चौरस / आयात आकारात करणे बंधनकारक जेणेकरुन नंतर ती जागा जलसंधारण विभागास पाण्यासाठी वापरता येईल . अशा खदानीतील

पान ४ वरून पुढे...

उत्खनन पुर्ण झाल्यावर तहसिलदार ती जागा जलसंधारण विभागाच्या ताब्यात देतील . ८. यापुर्वी खाणपटयांचे मंजुरी / नुतणीकरण ( शासकीय जमीनीवरील ) करण्यात आलेले आहे अशा खाणपट्टाधारक यांनी ३ वर्षात स्टोन क्रशर व एम–सॅन्ड युनीट उभारून उत्पादन करणे बंधनकारक आहे . ९ . नविन क्रशरला प्रदुषण विभागाने परवाना देतांना व जिल्हाधिकारी कार्यालयाने व्यापारी परवाना देतांना संबंधितास तीन वर्षात एम–सॅन्ड युनिट उभारणे बंधनकारक राहील . १० . खाजगी क्षेत्रावरील मंजुर व नुतणीकरण करण्यात आलेल्या खाणपट्टाधारक यांना पुढील ३ वर्षात एम– सॅन्ड युनिट कार्यान्वीत करुन एम–सॅन्ड उत्पादन करणे बंधनकारक राहील . उत्खनन वर्तुळकार / चौरस / आयात आकारात करणे बंधनकारक आहे . ११ . १०० टक्के एम–सॅन्ड चे उत्पादन करणा–या खाणपट्टाधारकास स्वामित्वधनात सवलत रु. ६००/– ऐवजी रु. ४००/– प्रमाणे स्वामित्वधन भरावे लागेल . जिल्ह्यात किमान ५० एम सँड निर्मिती प्रकल्प उभारण्याचे प्रयत्न सुरू झालेले आहेत . असे प्रकल्प उभारणाऱ्या उद्योजकास विविध सवलती देण्यात येणार आहेत . जिल्ह्यात कृत्रिम वाळू निर्मिती प्रकल्प सुरू करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन प्रयत्नशील आहेत . शासनाच्या निर्णयानुसार , शासकीय कामांसाठी २० टक्के कृत्रिम वाळू वापरणे बंधनकारक करण्यात आलेले आहे . जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात ५० प्रकल्प उभारण्याविषयी अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक आग्रही आहेत

### रोजेकर कुटुंबाला...

महिन्यापूर्वी दुर्धर आजाराने मृत्यूमुखी पडली. बाबासाहेब रोजेकर यांना वयोवृद्ध आई, वैभव व गणेश हे दोन शाळकरी मुले आहेत. रोजेकर कुटुंबावर अस्मानी संकट ओढावले आहे. याची दखल घेत चाटगाव ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून गणेशच्या उपचारासाठी पैसे जमवले आहेत. मयत बाबासाहेब रोजेकर याची आई सोजरबाई (वय ७५ वर्ष) हि सतत आजारी असते.येथील उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते गोविंद महादेव केकान यांनी सामाजिक बांधिलकी जपत सोजरबाई व रोजेकर भावंडांना आर्थिक व आरोग्याबाबत वेळोवेळी मदत करणार असल्याचे जाहीर केले. असून दहा हजार रुपये नगदी स्वरूपात मंगळवारी वैभव रोजेकर कडे सुपुर्द केले.

### चाकरवाडीत वारकऱ्यांचा...

क्षीरसागर यांनी केले तर भवसागर तरुण जाण्याचे तंत्र माऊली दादांनी जगाला दिले. माऊली दादांनी कधीच भेदभाव केला नाही. माऊलींची सेवा करण्याचं भाग्य प्रदीप मिश्रा यांना लाभले असे प्रतिपादन ह.भ.प.रामराव ढोक महाराज यांनी केले. माऊली दादा यांच्या पुण्यतिथी निमित्त गुलालाचे किर्तन करताना ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थितीत महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, महंत महादेव महाराज चाकरवाडीकर, ह.भ.प.नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर, ह.भ.प.रामभाऊ महाराज काजळे, ह.भ.प.नाना महाराज कदम, ह.भ.प.सुरेश महाराज जाधव, ह.भ.प.विठ्ठल महाराज आंधळे, शिवानंद महाराज गिरी, दिनकर कदम, अरुण डाके, विलास बडगे, गंगाधर घुमरे, सखाराम मस्के, तानाजी कदम, नवनाथ कुलकर्णी, अरुण बोगांणे, नानासाहेब काकडे पाटील यांच्यासह लाखो भावीक भक्तांची उपस्थिती होती. बीड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत विभुती ज्ञानेश्वर माऊली दादा यांच्या रोप्य महोत्सवी पुण्यतिथीनिमित्त माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची उपस्थिती होती. यावेळी त्यांच्या हस्ते माऊलीच्या समाधीची आरती करण्यात आली तसेच प्रसिद्ध शिवकथाकार प्रदीप मिश्रा यांचे स्वागत करून माजी मंत्री क्षीरसागर यांनी आशिर्वाद घेतले. कीर्तन प्रसंगी बोलताना ते म्हणाले की, संत माऊलीच्या पुण्यतिथीला दर वर्षी भक्तांचा मोठा संगम याठिकाणी पहायला मिळतो. यावर्षी तर कुंभमेळ्याचे स्वरूप दिसू लागले आहे. लाखो भाविक कथा श्रवणासाठी इथे आले रामायणाचार्य रामराव ढोक महाराज २५ वर्षापासून अखंडितपणे सेवा करत आहेत. सुरताल आणि भक्तीचा महापूर लोटला आहे. श्रीक्षेत्र चाकरवाडीत पंढरीच्या वाळवंटाचे स्वरूप आले आहे. माऊली बालघाटाचे आध्यात्मिक

पान ४ वरून पुढे...

वैभव आहे. माऊलींनी सोपा मार्ग सांगितला, अंधश्रध्दे पासून दूर करण्याचं काम माऊलीदादांनी केले आहे. जात ना पुछो साधूकी! देखो उसका ग्यान.असा दोहा सांगितला ते म्हणाले की, इथे अनेक त्रासातून आणि संकटातून मुक्त होणारे भाविक येतात, वारकरी संप्रदाय हा फक्त भक्तीच्या मार्गावर चालतो हे माऊली प्रत्येकवेळी सांगत असत. त्यामुळे इथे प्रत्येक जातीधर्माचा भाविक जोडला गेला आहे. महिन्याची वारी करणारे हजारो भाविक आहेत. इथे सेवेकर्याची प्रथा खूप मोठी आहे असे सांगून त्यांनी माऊलीच्या चरणी अभिवादन केले. यावेळी उत्सवात गुलालाचे कीर्तन करताना रामराव महाराज ढोक यांनी संत सेना महाराज यांच्या

उदार तुम्ही संत। मायबाप कृपावंत ।।१।।

या अभंगावर सुंदर चिंतन मांडले यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, श्री क्षेत्र चाकरवाडीत आज भव्य दिव्य सोहळा होत आहे. सुंदर ऐश्वर्य संपन्न सोहळा होत आहे. पुण्य करणार्याची पुण्यतिथी होते. परोपकार, पुण्य आणि पाप दुसर्याला पिडा करणे आहे. माऊली दादा यांनी जगाला भवसागर तरुण जाण्याचे तंत्र दिले असे महाराज म्हणाले. यावेळी साथ संगत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मृदंग वादक राम महाराज काजळे, गायनाचार्य संतोष महाराज सुंबळे, अभिमान महाराज ढाकणे, भारत महाराज मुरकुटे, मुंडे महाराज, माऊली महाराज आवटे, सतीश महाराज जाधव यांच्यासह महाराष्ट्रातील नामांकित गायक वादक मंडळी उपस्थित होते.

### गृह वस्तूंचा...

(सभापति कृ.ऊ.बा.स.)श्रीहरी नाना मोरे (उपसभापति कृ.ऊ.बा.स) खलील पटेल (शहर अध्यक्ष रा.कॉ.पा.अ.प.गट) तालेब भैय्या चाऊस (मा.गट नेते न.प.) समीर शेख (क्रांतिकारी शि.सं. मराठवाडा सचिव) मुजम्मिल पटेल (समाज सेवक) मा.सौ.रुपाली कचरे,मा.सौ सुनीता नेटके, मा. शेख अदनान, बाबा शेख आदी मान्यवरांच्या उपस्थितित होणार वाटप.

### विनाअनुदान शाळा...

राज्यातील विनाअनुदानित शाळेच्या अनुदानासाठी व अंशतः अनुदानित शाळांना टप्पा वाढी संदर्भातील १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची तत्काळ अंमलजावणी करा या मुख्य मागणीसह इतर विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदान शाळा कृती समितीच्या वतीने नाशिक ते मालेगाव पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या पायी दिंडीची शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दखल घेत कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना बोलावून घेतले. नाशिक जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समिती तसेच सर्व समविचारी संघटनांच्या प्रतिनिधींनी मालेगाव येथे जाऊन विनाअनुदानित शाळाना टप्पावाढ संदर्भात व १४ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलजावणी बाबत सखोल चर्चा केली. तसेच ११ जून पासून नाशिक ते मालेगाव पायी दिंडीचे नियोजन केले आहे असे शिक्षणमंत्री भुसे यांना सांगितल्यावर ना. दादा भुसे यांनी तुम्ही पायी प्रवास किंवा आत्मक्लेश करून घेऊ नका. लवकरात लवकर तुमचा प्रलंबित विषय संपेल मी मागील बऱ्याच दिवसांपासून निधीसाठी तजवीज कशी होईल हे बघतो आहे. यावर शिष्टमंडळातील काही पदाधिका–यांनी येत्या पावसाळी अधिवेशनात निधीची तरतूद करा अशी विनंती केली. यावेळी भुसे यांनी तुमच्या वरिष्ठ पदाधिका–यांना मुंबईला बोलवा मी स्वतः मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांची वेळ घेऊन बैठक लावतो असे आश्वासन दिले. शिक्षण मंत्र्यांनी दिलेला शब्द प्रमाण म्हणून टप्पा वाढीच्या निधी तरतुदीसाठी व विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांचे प्रश्न विषय मार्गी लावण्यासाठी स्वतः शिक्षण मंत्री तयार असल्याने नाशिक ते मालेगाव पायीदिंडी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्या समवेत १७ किंवा १८ तारखेला बैठक होणार आहे. तत्पूर्वी राज्यातील सर्व शिक्षकांनी मुंबई येथील आझाद मैदानावर आंदोलनासाठी आजपासून उपस्थित रहावे असे आवाहन खंडेराव जगदाळे यांच्यासह के के अहिरे, बाळासाहेब ढोबळे, अरुण पवार, अनिलदादा निकम, भारत भामरे, अविनाश चौधरी, शरद शेलार, प्रशांत बच्छाव, संजय आहेर, बोरसे सर, चव्हाण सर, संजय देवरे सर आदींनी केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विविध 21 कामांचे भूमिपूजन व लोकार्पण

## अकोला जिल्ह्यातील विकासाचा प्रवाह गतिमान ; २ हजार ५८८ कोटी ५५ लाख रू. निधीतून विकासकामे

**अकोला । प्रतिनिधी**

अकोला जिल्ह्यात सुमारे अडीच हजार कोटींहून अधिक म्हणजेच २ हजार ५८८ कोटी ५५ लाख रूपयांच्या निधीच्या विविध २१ विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज झाले. सिंचन, रस्ते, रूग्णालय सुधारणा, सांस्कृतिक भवन, तरण तलावासह विविध प्रशासकीय इमारती अशा विकास कामांमुळे जिल्ह्यातील विकासाचा प्रवाह गतिमान होणार आहे.




विविध विकास कामांचे भूमि पूजन व लोकार्पण जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार सर्वश्री रवींद्र चव्हाण, हरिष पिंपळे, प्रकाश भारसाकळे, वसंत खंडेलवाल, किरण सरनाईक, श्याम खोडे, विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, पोलीस महानिरीक्षक रामराव पोकळे, जिल्हाधिकारी अजित कुंभार, पोलिस अधिक्षक अर्जित चांडक आदि मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते सर्वप्रथम जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नवीन, अद्ययावत व सुसज्ज इमारतीचे लोकार्पण झाले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील स्वागत कक्ष, हिरकणी कक्ष, आनंदी कक्ष, आवश्यक दस्तऐवज मिळण्यासाठी किऑस्क सुविधा आदींचे निरीक्षण केले. त्यानंतर नियोजन भवनात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते एकाचवेळी ऑनलाईन पद्धतीने विविध विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला.

अकोला येथील तहसील, तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या अद्ययावत इमारतीचे तसेच महिला व बालविकास भवनाचे लोकार्पण झाले. पूर्णा नदीवरील काटीपाटी बॅरेज प्रकल्पाचे भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. सुमारे ४५४.६२ कोटी रूपयांच्या निधीतून सिंचनाची व्यवस्था निर्माण होऊन शेतकरी बांधवांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून कृषी संशोधनाचा वारसा असलेल्या अकोला भूमीत २४९.४१ कोटी रूपये खर्चून बांधण्यात आलेल्या पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयाच्या इमारतीचा कोनशिला समारंभही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने झाला. अकोला शहरात अमृत २.० योजनेत ६२९.०६ कोटी रू. निधीतून मलनि:सारण (टप्पा-१) चे काम, तसेच शहरासाठी १८.९९ कोटी रू. निधीतून प्रधानमंत्री ई-बस सेवा योजनेत ई-बस डेपो व चार्जिंग स्टेशनचे भूमिपूजन झाले. त्याचप्रमाणे, १५ कोटी रू.निधीतून अद्ययावत सांस्कृतिक भवन, सुमारे ९.९६ कोटी रू. निधीतून ऑलिंपिक दर्जाचा तरणतलावाचा कोनशिला समारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला.

'हायब्रीड न्युइटी' अंतर्गत मुर्तिजापूर-दहिगाव-गुडधी-उमरी- अकोला राज्य महामार्ग २८४, तसेच अकोला-मलकापूर-कानशिवणी-मोरगांव काकड-बोरगांव खुर्द जिल्हा प्रमुख मार्गाची सुधारणा ४१०.१० कोटी रू. निधीतून होणार आहे. त्याचे भूमि पूजन यावेळी झाले. त्याचप्रमाणे, उकळी बाजार-नेर- नांदखेड-किनखेड राज्य महामार्ग २७८, किनखेड ते दहिहंडा महामार्गाची सुधारणा, अकोट मतदारसंघातील राज्यमार्ग क्र.४७ रावेर, पातूर्डा, पिंपळगाव, खांडवी, जळगाव जामोद- हिवरखेड- अकोट या मार्गावरील (रंभापूर ते हिवरखेड ते वारखेड भाग) सुधारणा ३११.४४ कोटी निधीतून होत आहे. बार्शिटाकळी शहरात ९.९९ कोटी रू. निधीतून मुख्य रस्ता होत आहे. या कामांचे भूमिपूजन झाले.

# मुदतबाह्य खानपट्टा यांची तपासणी करण्याचे महसूल मंत्र्याचे निर्देश

## बीड जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या कामाची पद्धत पाहता कारवाई होईल का यावर संशय : अजय सरवदे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये मुदत संपुष्टात आलेल्या १२ स्टोन क्रेशर व ५३ खानपट्टाधारकांची माहिती विज बिल न भरल्याने याबाबतीत शासनास व मंत्री महोदयांना तक्रार सादर केली होती. तक्रारीच्या अनुषंगाने नियमानुसार मंजूर व नूतनीकरण केलेल्या काही खाणपट्टाधारकांकडून खानपट्टा आदेशातील, करारनाम्यातील व पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तींचा भंग होत असल्याबाबत शासनाकडे वारंवार तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, त्या अनुषंगाने महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियमाम धील नियम ८० नुसार राज्यातील गौण खनिजांच्या खाणपट्ट्यांची मोहीम स्वरूपात तपासणी करणे आवश्यक आहे असे पत्र काढले आहे. बीड जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी अनधिकृत व मुदत संपुष्टात आलेल्या खानपट्टा व स्टोन क्रेशर धारक यांच्यावर तात्काळ नियमानुसार दंडात्मक कारवाई करून संबंधित खानपट्टा व स्टोन क्रेशर सील करून दोन दिवसात अहवाल सादर करण्याचे निर्देश तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांनी दिली होते.

### ७ दिवसाच्या आत परिपूर्ण माहिती शासनास सादर करण्याचे आदेश

**जिल्ह्यातील खाणपट्ट्याची तपासणी करण्यात यावी आणि तपासणीत खाणपट्टाधारक यांनी अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास आल्यास प्रचलित कायद्यातील व नियमावलीतील तसेच करारनाम्यातील व पर्यावरण अनुमतीमधील तरतुदीनुसार आपण कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती ७ दिवसात शासनास सादर करावी. शासनाने कितीही खानपट्टा तपासणीसाठी नमुने / अर्ज पाठवले तरी बीड जिल्ह्यातील अधिकारी-कर्मचारी यांच्यात दडलेले नमुने यामधून आर्थिक व्यवहार करत कारवाई तर करणारच नाहीत पण खोटी माहिती शासनास सादर करतील. - अजय सरवदे, जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड (प)**

तसेच अनाधिकृत व मुदतबाह्य खानपट्टा बस स्टोन क्रेशर यांचा विद्युत पुरवठा बंद करण्यासाठी अधीक्षक अभियंता महावितरण मंडळ कार्यालय बीड यांनाही पत्र व्यवहार केला होता.

सदर प्रकरणी तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत संबंधित मुदतबाह्य खानपट्टा व स्टोन क्रेशर धारकांकडून आर्थिक व्यवहार करत कारवाई केली नाही.

सदर प्रकरणी जिल्हाधिकारी बीड यांच्या आदेशाला महत्व न देणाऱ्या उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केली होती.

# ३८ हजार विद्यार्थ्यांना १ लाख ७३ हजार पुस्ताकांचे होणार वाटप



### • १६ जुनपासुन भरणार शाळा

**माजलगाव । प्रतिनिधी**

येत्या १६ जुन पासुन शाळा भरणार असुन त्या अनुषंगाने शिक्षण विभागाने तयारी केली असुन शाळा भरण्याच्या पहिल्याच दिवशी ३८ हजार ६११ विद्यार्थ्यांना एक लाख ७३ हजार पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती शालेय शिक्षण विभाग प्रशासनाकडुन देण्यात आली आहे.

तालुक्यामध्ये जिल्हा परिषदेच्या २२७ शाळा असुन विद्यार्थीसंख्या ३८ हजार ६११ आहे. जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी शासनाच्या वतीने विवीध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके, मध्यान्ह भोजन यासह विवीध विद्यार्थी हिताच्या योजना आहेत तर यावर्षी नव्याने जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमधील पहिली वर्गाला सिबीएसई पॅटर्नचा अभ्यासक्रम लागु करण्यात आला आहे. राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने एक पाउल पुढे टाकत सेमी माध्यमाचे शिक्षण सर्वसामान्य, शेतक-यांच्या मुलांना मिळावे यासाठी सिबीएसई पॅटर्नचे शिक्षण देण्यास सुरूवात केली आहे. याचा निश्चीतच फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे. दरम्यान १६ जुनपासुन शाळा भरणार असुन पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेत उपस्थित असणे अनिवार्य आहे.

**आकडे बोलतात...**

मराठी माध्यम - १ ली ते ८ वी विद्यार्थी संख्या - २६ हजार ८९५.
उर्दु माध्यम - विद्यार्थी संख्या - ३ हजार २१६.
जिल्हा परिषद शाळांची संख्या - २२७.
अनुदानित शाळांची संख्या - ३८.
पुस्तकांची संख्या - १ लाख ७३ हजार १९४.
सेमी माध्यम - १ ली ते ८ वी विद्यार्थी संख्या - ८ हजार ५००.
सेमी माध्यम पुस्तकांची संख्या - १४ हजार ८००.

दरम्यान यावर्षी नव्याने सुरू होणारा सिबीएसई पॅटर्न पहिलीच्या वर्गाला लागु करण्यात आला असुन त्याची देखील पुस्तके उपलब्ध झाले असुन १६ जुन रोजी या पुस्तकांचे देखील वाटप करण्यात येणार असल्याचे शिक्षण विभागाने सांगीतले आहे.

# घाटसावळी येथे शेताच्या बांधावरून दोन गटांत तुंबळ हाणामारी : दहा जण जखमी

### लोखंडी पाईप, कुऱ्हाडी व दंडुक्याने मारहाण

**घाटसावळी । प्रतिनिधी**

दिनांक ११ जून २०२५ रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास घाटसावळी गावात शेताच्या बांधावरून दोन गटांत तुंबळ हाणामारी झाली. या घटनेत एकूण दहा जण जखमी झाले असून त्यातील सात जण एका गटातील तर तीन जण दुसऱ्या गटातील आहेत.



प्राप्त माहितीनुसार, लांडे भावांमध्ये बऱ्याच दिवसांपासून शेताच्या वाटणीवरून वाद सुरू होता. आज सकाळी हा वाद चांगलाच चिघळला आणि दोन्ही गटांनी एकमेकांवर दांडके, कुऱ्हाड व लोखंडी पाईप यांसारख्या हत्यारांनी हल्ला चढवला. यात गंभीर स्वरूपाच्या जखमा झालेल्या व्यक्तींना तातडीने बीड येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच डीवायएसपी पूजा पवार व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बंटेवाड व एलसीबीचे कर्मचारी बप्पासाहेब घोडके यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. त्यांच्या सतर्कतेमुळे जखमींना वेळेत रुग्णालयात पोहोचवता आले.पोलीस पुढील तपास करत असून दोन्ही गटांवर गुन्हे नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे. गावात तणावाचे वातावरण असून पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

# अवघ्या दोन तासांत खुनाचा प्रयत्न करणारे पाच जण जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी ; शेतातील वादावरून झालेल्या हाणामारीप्रकरणी कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

पिंपळनेर पोलीस स्टेशन हद्दीतील घाटसावळी (ता. गेवराई) गावात शेताच्या वादातून दोन गटांमध्ये तुफान हाणामारी झाली. या घटनेत खुनाचा प्रयत्न करण्यात आल्याची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक (खझड) मा. नवनीत काँवत साहेब यांनी तातडीने कारवाईचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले.

पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या नेतृत्वाखाली तात्काळ पथके तयार करून बीड जिल्ह्यात विविध ठिकाणी पाठवण्यात आली. केवळ दोन तासांच्या आत ही कारवाई यशस्वी ठरली असून, पाचही आरोपींना अटक करण्यात आली आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे अशी आहेत - सुग्रीव नामदेव लांडे, महेश ऊर्फ मसु वैजिनाथ लांडे, रेवन नामदेव लांडे, प्रकाश मुक्तीराम लांडे आणि महादेव नवनाथ लांडे. हे सर्व आरोपी घाटसावळी गावचे रहिवासी आहेत. या आरोपींनी शेताच्या मालकीवरून वाद घालून दुसऱ्या गटावर धारदार शस्त्रांनी



हल्ला करत खुनाचा प्रयत्न केला होता. घटनेच्या गांभीर्यामुळे पोलिसांनी झटपट तपास करून, अचूक माहितीच्या आधारे आरोपींना पकडले. या यशस्वी कारवाईसाठी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि स्था. गु. शा. बीडचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उ.नि. सिद्धेश्वर मुरकुटे, राहुल शिंदे, महेश जोगदंड, राजू पठाण, बप्पासाहेब घोडके, विक्की सुरवसे, गणेश मराडे, सुनील राठोड आणि गणेश हंगे यांनी मेहनत घेतली. पोलीस दलाच्या अचूक आणि वेगवान कारवाईमुळे परिसरात शांतता निर्माण झाली असून, नागरिकांत समाधान व्यक्त केले जात आहे.

# मातंग समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा डीपीआय पक्षातर्फे गौरव

**तलवाडा । प्रतिनिधी**

मातंग समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल पण शैक्षणिकदृष्ट्या उजळ कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी स्मृतीशेष आत्मारामजी चांदणे साहेब यांच्या जन्मदिनानिमित्त डीपीआय पक्षाच्या वतीने एक विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. शहरातील हॉटेल नीलकमल येथे भरलेल्या या कार्यक्रमात शेकडो विद्यार्थी, पालक आणि समाजबांधवांनी उपस्थिती लावली होती.

या कार्यक्रमामध्ये दहावी, बारावी तसेच पदवी स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना हार,शाल, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या गौरवाने संपूर्ण सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाचे आयोजन डीपीआय पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील पाटोळे आणि कार्यकर्ते बाळासाहेब पोळ यांच्या पुढाकाराने करण्यात आले. आजच्या या उपक्रमाचा उद्देश केवळ सत्कार नव्हे, तर विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवणे, त्यांना योग्य दिशा देणे आणि समाजातील इतर विद्यार्थ्यांमध्येही



शिक्षणाबाबत जागरूकता निर्माण करणे हा आहे. मातंग समाजातील अत्यंत आर्थिक दुर्बल घटकातील दहा गुणवंत विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या खर्चाची जबाबदारी डीपीआय पक्ष घेणार आहे. या निर्णयाने उपस्थित पालक आणि समाजबांधवांमध्ये आनंद आणि आश्वासकता पसरली.मातंग समाजामध्ये अजूनही शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार मनात बाळगून शिक्षणाच्या वाटेवर पुढे जावे. आयएएस, आयपीएस होण्याची स्वप्ने बाळगावीत. आपल्या समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणायचे असेल तर आपण सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. असे वक्तव्य जिल्हाध्यक्ष सुनील पाटोळे यांनी यावेळी केले. कार्यक्रमास अनेक मान्यवर पाहुणे, शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षक उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणातील महत्त्व, ध्येय निश्चिती आणि चिकाटी याबद्दल मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारांनी उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. या कार्यक्रमामुळे आत्माराम जी चांदणे यांना अभिप्रेत असणाऱ्या मातंग समाजातील विद्यार्थ्यांना केवळ सन्मान मिळालेला नाही, तर त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मानसिक बळ देखील मिळाले आहे. शिक्षण क्षेत्रात अधिक प्रगती करण्यासाठी समाजातील सर्व स्तरांतील व्यक्तींनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांना आधार देण्याची गरज आहे, हेच या कार्यक्रमातून अधोरेखित झाले.

उपस्थित मान्यवर:- उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, तुलशी संगणक महाविद्यालयाचे सर्वेसर्वा प्रदीपजी रोडे सर, उत्तम जी पवार, प्रा.शिवराज बांगर अशोक बप्पा सोनवणे,बळीराम चांदणे.

आयोजक सुनिल पाटोळे, बाळासाहेब पोळ, संयोजन समिती नितीन धुताडमल, अमोल मैंदेकर, सचिन धुरंधरे, आकाश धूताडमल, ज्ञानदेव लोंढे, बबन थोरात, अभिषेक मुजमुले, सागर साहेब कांबळे, प्रेम गणेश कांबळे व इतर उपस्थितीत होते.

CMYK

दैनिक ● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

गुरूवार, दि.१२ जून २०२५ पान ४

## मोमीन रेहान याचा अपघाती मृत्यू



**माजलगाव ।** प्रतिनिधी

माजलगाव येथील केसापुरी कॅम्प येथून जात असताना समोरून येणाऱ्या दुचाकी ला कट लागल्याने रेहान मोमीन याची दुचाकी डिव्हायडरला जाऊन धडकल्याने यामध्ये रेहान गंभीर जखमी झाला होता. पुढील उपचारार्थ छत्रपती संभाजीनगर येथे घेऊन जात असताना रस्त्यातच रेहान मोमीन याचा मृत्यू झाला. मोमीन रेहान राहणार माजलगाव हा दुचाकीवरून केसापुरी कॅम्प येथून माजलगाव कडे जात असताना समोरून आलेल्या दुचाकीला कट लागल्याने मोमीन याची दुचाकी बाजूला असलेल्या डीवाईडल धडकली यामध्ये रेहान मोमीन हा गंभीर जखमी झाला होता. पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे घेऊन जात असताना रस्त्यातच रेहान ▶▶ उर्वरित पान २ वर

# जि.प. शाळा वाचवण्यासाठी शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षावर आत्मदहनाचा इशारा देण्याची वेळ

**बीड ।** प्रतिनिधी

कीकडे येत्या शैक्षणिक वर्षापासून पहीलीपासुन विद्यार्थ्यांना सीबीएसई पॅटर्न राबविण्यात येणार आहे त्यामुळे गावच्या मुलांनी इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे न जाता गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घ्यावे यासाठी २५% पटसंख्या वाढीचे उद्दिष्ट शासनाने दिले असून त्यासाठी आवश्यक सूचना दिलेल्या आहेत. जिल्हापरीषदेच्या शाळांमध्ये पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांनी जुनच्या पहिल्या आठवड्यापासून कामाला लागण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. मात्र याचवेळी केज तालुक्यातील नांदुरघाट येथील जिल्हा परिषदेची शाळा वाचवण्यासाठी शालेय शिक्षण समिती अध्यक्ष अमोल सखाराम जाधव यांनी शिक्षण विभाग व जिल्हा प्रशासन सहकार्य न करता खाजगी संस्था चालकांचे हित जोपासत अडथळे निर्माण करत असल्याने दि.१४ जुन रोजी शाळेच्या प्रांगणात आत्मदहनाचा इशारा जिल्हा प्रशासनाला दिला आहे. अमोल जाधव यांच्या न्याय मागण्या मान्य करून त्यांना आत्म दहनापासुन परावृत्त करण्यात यावे हि शासन आणि प्रशासनासाठी लाजीरवाणी बाब असल्याचे म्हणत मुख्यमंत्री, पालकमंत्री बीड, शिक्षणमंत्री, विभागीय आयुक्त यांना जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

नांदुरघाट येथील जिल्हा परिषद शाळा वाचविण्यासाठी नांदुरघाट ग्रामस्थांचा लढा गेल्या १८ महिन्यांपासून सुरू असुन जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांना घरपट्टी, नळपट्टी ▶▶ उर्वरित पान २ वर

## तेलगाव येथील महामार्गावरील साठलेला पाण्याचा प्रश्न गंभीर

### एम.आर.डी.सी. च्या अभियंत्यांनी पाहणी करुन दिले आश्वासन

**तेलगाव ।** प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील तेलगाव येथील येथून जाणाऱ्या महामार्गावरील साठलेल्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून हा प्रश्न तेलगाव येथील नागरिकांनी उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री अजित पवार, खा. बजरंग सोनवणे,आ. प्रकाश सोळंके यांना निवेदन देऊन कानावर घातल्यानंतर एम.आर. डी. सी. च्या अधिकारी आणि अभियंत्यानी आज तेलगाव येथे येऊन पाहणी केली. पाण्याचा



निचरा करण्यासाठी उपाययोजना करुन ▶▶ उर्वरित पान २ वर

## कृत्रिम वाळू (एम सॅन्ड) वापरा

### निर्मितीसाठी शासनाच्या विविध सवलती : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**बीड ।** प्रतिनिधी

शासनाने शासकीय कामासाठी एम सॅन्ड ( मॅन्युफॅक्चर्ड सॅन्ड) अर्थात कृत्रिम वाळूचा वापर करणे बंधनकारक केले आहे . यामुळे सध्या जिल्ह्यात कृत्रिम वाळू निर्मिती करणारे फारसे उद्योग नसल्याने शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात अडचणी येत होत्या. यामुळे जिल्ह्यात किमान ५० कृत्रिम वाळू निर्मिती केंद्र सुरू करण्यात यावीत असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे. नुकतीच



जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांची व्हिडिओ कॉन्फरन्स घेतली . यावेळी वाळू निर्मिती प्रकल्प सुरू करण्याचे आवाहन उद्योजकांना करावे असे ठरले . नद्यामधून निर्मित होणाऱ्या वाळूमुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत . वाळू माफिया , गुन्हेगारी असे अनेक गैरप्रकार होत आहेत . यामुळे शासनाने बांधकाम प्रकल्पांमध्ये कृत्रिम वाळूचा वापर वाढावा यासाठी धोरण निश्चित केले आहे. यानुसार , शासकीय ▶▶ उर्वरित पान २ वर

## रोजेकर कुटुंबाला गोविंद केकान याचा आधार



**दिंद्रुड ।** प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील चाटगाव येथील बाबासाहेब रोजेकर यांचे अपघातात अकाली निधन झाले. या अपघातात त्याचा मुलगा गणेश हा गंभीर जखमी झाला. त्याच्यावर बीड येथील खाजगी रुग्णालयात उपचार चालू आहेत. बाबासाहेब याची पत्नी अनिता ही सहा ▶▶ उर्वरित पान २ वर

## महाराष्ट्र ग्रामीण बँक तलवाडा शाखेचे इंगळे ग्राहकांशी करु लागले अरेरावी

**शेख आतिख**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखेचा जवळपास पंचविस ते तीस गावाचा संपर्क येत असुन आणेक वयोवृद्ध व दुर्धर आजाराने ग्रस्त ग्राहक या ठिकाणी बँकेच्या ऊर्मट कर्मचा-यामुळे सातत्याने त्रस्त आसल्याचे मोठ्या प्रमाणात तक्रारी असुन प्रतीदिन तलवाडा महाराष्ट्र ग्रामीण बँक तलवाडा शाखेत येणा-या ग्राहकांना या कर्मचा-याच्या अरेरावीला सामोरे जावे लागत आहे. वास्तविक पहाता सकाळी बँकेच्या वेळेनुसार बँक ऊघडत



नसुन दुपारी मात्र लंच वेळ झाल्याचे निमित्त करुन दिड ते तीन वाजे पर्यंत ज्यांना निट ऊभेही राहता येत नाही आस्या ग्राहकांना तब्बल दिड तास ताटकळत दर रोज बसावे लागते आहे. वास्तविक पाहता शासनाच्या आधिन आसलेल्या कुठल्याही बँकेला लंच टाईम नसतो. तरी सुद्धा मानुसकिच्या नात्याने ग्राहक सर्व सहन करत आसतांना देखील इंगळे सारखा कर्मचारी बँक ग्राहकांशी अरेरावीने वागत आसल्याच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी असुन आस्या मुजोर कर्मचारी इंगळे कडे वरिष्ठ प्रशासन लक्ष देईल काय आशी मागणी त्रस्त ग्राहकातुन करण्यात येत आहे.

## चाकरवाडीत वारकऱ्यांचा कुंभमेळा आणि भक्तीचा संगम: माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**नेकनूर ।** प्रतिनिधी

विसाव्या शतकातील संत ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या पंचविसाव्या रौप्यमहोत्सवी पुण्यतिथी निमित्त भक्तीचा सागर आणि कुंभमेळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. केवळ सेवाभाव असल्याने इथे भाविकांची मांदियाळी जमली असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त ▶▶ उर्वरित पान २ वर





*मौजे मोरवड तालुका वडवणी येथे बीज उगवण क्षमता बीज प्रक्रिया कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी बीज उगवण क्षमता,बीज उगवण क्षमता सोबतच हुमणी नियंत्रण,महाडीबिटी वरील झालेले बदल , प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना,गटासाठी बियाणे ऑनलाईन अर्ज संबंधी सर्व माहिती देण्यात आली.याप्रसंगी कृषी अधिकारी जाधवर साहेब ,उप कृषी अधिकारी ठोंबरे साहेब, सहाय्यक कृषी अधिकारी तिडके साहेब व आत्मा कर्मचारी उपस्थित होते.*

## गृह वस्तूंचा कॅम्प झालेल्या बांधकाम कामगारांनी गृह वस्तूंचा लाभ घ्यावा: शफीक भाऊ, परमेश्वर सोळंके

### बहुजनांचे नेते बाबूरावजी पोटभरे यांच्या हस्ते होणार वाटप सोहळा

**माजलगांव ।** प्रतिनिधी

माजलगांव शहरामधील वैष्णवी मंगल कार्यालय येथे दिनांक १८/४/२०२५रोजी



नोंदीत बांधकाम कामगारांना गृह उपयोगी वस्तुचा ऑनलाईन कॅम्प घेण्यात आला होता. त्याच नोंदीत बांधकाम कामगारांना गृह उपयोगी वस्तुचा दिनांक १५/०६/२०२५ रविवार रोजी दुपारी ठीक १:०० वाजता बजाज कॉम्पलेक्स मध्ये दूसरा मजल्यावर व्यंकटेश हॉल येथे वाटप करण्यात येणार आहे तरी सर्व नोंदित कामगारांनी उपस्तित राहून गृह वस्तुचा लाभ घ्यावा असे शेख हमीद (शफीक भाऊ) व परमेश्वर सोळंके यांनी सांगितले. या कार्यक्रमाला रमेशरावजी आडसकर अंबा साखर का.अंबाजोगाईचे चेअरमन, अमर शेख महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनाचे संस्थापक अध्यक्ष, गंगाधर नाना काळकुटे, दैनिक सूर्योद संपादक राजेश्वर चव्हाण जिल्हा अध्यक्ष (रा.कॉं. पा.अ.प.गट) शीतल ताई धोंडरे, (जनसेविका) जयदत्त नरवडे ▶▶ उर्वरित पान २ वर

# विनाअनुदान शाळा कृती समितीच्या नाशिक-मालेगाव पायीदिंडीची शिक्षणमंत्र्यांनी घेतली दखल

### मालेगाव पायीदिंडी तात्पुरती स्थगित

### कृती समितीच्या शिष्टमंडळासमवेत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांसोबत बैठक लावण्याचे शिक्षणमंत्री भुसे यांचे आश्वासन

**बीड ।** प्रतिनिधी

राज्यातील विनाअनुदानित शाळांना अनुदान व अंशतः अनुदानित शाळांना टप्पा वाढ व १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलजावणी करा या मुख्य मागणीसह इतर विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदान शाळा कृती समितीच्या वतीने नाशिक ते



मालेगाव पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या पायी दिंडीची शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दखल घेत कृती समितीच्या शिष्टमंडळाना बोलावून घेत टप्पा वाढीसाठी लागणाऱ्या निधीची तरतूद करण्यासाठी कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांची मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या समवेत मुंबईत बैठक लावतो असा शब्द शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिल्यामुळे कृती समितीच्या वतीने सध्या नाशिक मालेगाव पायी दिंडी स्थगित करण्यात आल्याचं संघटनेचे उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी सांगितले. दरम्यान १७ किंवा १८ तारखेला बैठक होणार आहे तत्पूर्वी राज्यातील सर्व शिक्षकांनी मुंबई येथील आझाद मैदानावर उपोषणासाठी आजपासून उपस्थित रहावे असे आवाहन खंडेराव जगदाळे यांनी केले. ▶▶ उर्वरित पान २ वर

## शासकीय वसतिगृहात आदिवासी मुला- मुलींची प्रवेश प्रक्रिया सुरु

**बीड ।** प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात शिक्षण घेत असलेल्या इयत्ता ८ वी पासून पुढील वर्गातील सर्व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी आदिवासी विकास विभागामार्फत चालविल्या जाणा-या अंबाजोगाई येथील आदिवासी मुलां मुलींच्या शासकीय वसतिगृहासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे.

तरी इच्छुक विद्यार्थ्यांनीुूरा.ारहरेपश्रळपश.सीं.ळप या संकेत स्थळावर जावून ऑनलाईन अर्ज करावेत. काही अडचण आल्यास गृहपाल, आदिवासी मुलांचे-मुलींचे शासकीय वसतिगृह अंबाजोगाई जि. बीड यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृहाचे गृहपाल यांनी केले आहे.




CMYK